महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपाल

## श्रीमती विजयालक्ष्मी पंडित

यांनी केलेले

# भाषण

१३ फेब्रुवारी १९६४

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

सभापती, अध्यक्ष आणि सन्माननीय सदस्य,

विधानमंडळाच्या या अर्थसंकल्पीय अधिवेशनप्रसंगी आपणा सर्वांचे स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे. आपणापुढे भाषण करण्याचा हा सुयोग मला दुसऱ्यांदा प्राप्त होत आहे. आपण करणार असलेल्या अर्थपूर्ण चर्चेकडे मी मोठ्या अपेक्षेने पहात आहे.

या राज्याचे भूतपूर्व मुख्य मंत्री श्री. मा. सां. कन्नमवार यांच्या दुःखद निधनाबद्दलची आमची तीव्र शोकभावना मी प्रारंभीच प्रकट करू इच्छिते. त्यांच्या निधनाने केवळ या राज्याचीच नव्हे तर अखिल राष्ट्राची हानी झालेली आहे. आपणापैकी पुष्कळांच्या बाबतीत त्यांचे निधन ही तर वैयक्तिकच हानी मानावी लागेल. ते कर्तबगार आणि कळकळीचे प्रशासक होते; त्यांच्या व्यक्तिमत्वात अनन्यसाधारण गोडवा आणि दयाळूपणा होता आणि सर्वार्थाने जनतेशी समरस झालेले असे ते एक लोकाग्रणी होते.

पंतप्रधानांच्या अलीकडील आजारामुळे सर्व भारताला चिंता वाटत होती. आपल्या इतर देशबांधवांच्या सारखीच आपणही चिंता करत होतो. सुदैवाने, त्यांची प्रकृती आता झपाट्याने सुधारत आहे. ते लवकरात लवकर पूर्ण बरे होवोत आणि मायभूमीच्या सेवेसाठी त्यांना प्रदीर्घ आयुष्य लाभो अशी मी माझ्या स्वतःच्या, माझ्या सरकारच्या आणि आपणा सर्वांच्या वतीने उत्कट आशा व्यक्त करते व प्रार्थना करते.

हे अधिवेशन विशेष महत्त्वाचे ठरेल असे मला वाटते. देशाच्या संरक्षणासाठी आणि या राज्यातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक कल्याणासाठी माझ्या सरकारने जे उपाय योजिले आहेत किंवा योजण्याचे ठरविले आहे, त्यांचा या अधिवेशनात आपणास विचार करावा लागणार आहे. आपले हे काम सोपे नाही हे खरे पण ते निश्चित फलदायी होईल याची मला पूर्ण खात्री आहे.

२. या वर्षी आपल्या भूमीवर आणखी अतिक्रमण झालेले नसले, तरीही आमच्या सीमांवरील बाह्य आक्रमणाचा धोका टळलेला नसून ते संकट आपणास अजूनही भेडसावीत आहेच आणि म्हणून या राज्यातील संरक्षण प्रयत्न अविरत चालू ठेवणे हे माझ्या सरकारचे प्रथम कर्तव्य राहील. या दृष्टीने राष्ट्रीय संरक्षण निधीला देणग्या, लढणाऱ्या सैनिकांना भेटी, नगरसेनेची आणि सहायक नगरसेनेची भरती आणि त्यांचे प्रशिक्षण आणि जवानांसाठी रक्तपेढींची उभारणी याबाबतीत महाराष्ट्र नेहमीप्रमाणेच मोठा वाटा उचलीत आहे. आपल्या राष्ट्रीय संरक्षण निधीत आतापर्यंत साडेनऊ कोटी रुपये आणि अडीच लाख ग्रॅम सोने जमा झालेले आहे. केवळ मनुष्यबळ आणि द्रव्यबळ यांपुरताच नव्हे तर २१,००० पेक्षा अधिक कुप्या रक्तदान देखील करून महाराष्ट्राने संरक्षण प्रयत्नांतील आपला वाटा उचलला आहे.

३. या राज्यातील अल्पबचत मोहीम दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आली आहे. तिसऱ्या योजनेच्या वित्तव्यवस्थेसाठी या राज्याच्या उत्पन्नामधून द्यावयाच्या २२५ कोटी रुपयांपैकी या मोहिमेच्या

द्वारे ९० कोटी रुपयांहून अधिक रक्कम उपलब्ध होईल असा अंदाज आहे आणि यावरून या मोहिमेचे महत्व प्रत्ययास येईल. या रकमेपैकी ५८ कोटी रुपये योजनेच्या पहिल्या अडीच वर्षांतच गोळा झालेले आहेत. चालू वर्षाचे २१·१७ कोटी रुपयांचे लक्ष्य सहज साध्य होईल अशी आमची पूर्ण अपेक्षा आहे. मुंबई शहराने आणि ठाणे व रत्नागिरी या जिल्ह्यांनी आपले लक्ष्य आधीच ओलांडलेले आहे ; व पुणे, नागपूर व इतर काही जिल्हे आपले लक्ष्य गाठण्याच्या मार्गावर आहेत. आजवर अल्पबचत मोहीम ही, शांतताकालीन अर्थव्यवस्थेच्या योजनांशी निगडीत होती. आता मात्र परकीय आक्रमणामुळे आपल्यावर जो अतिरिक्त भार येऊन पडला आहे आणि परिणामी संरक्षणासाठी जी जादा पैशाची गरज निर्माण झाली आहे ती भागविण्याच्या कामी तिचा रोख वळविण्यात आला आहे.

४. विशेषतः जनतेचे मनोधैर्य टिकवून ठेवण्यासाठी या राज्याच्या सर्व क्षेत्रांतील लोकांनी जो पाठिंबा दिला त्याबद्दल माझे सरकार हार्दिक कृतज्ञता व्यक्त करीत आहे. राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करण्यासाठी हे सरकार आपल्यापरीने शक्य ते सर्व उपाय योजील आणि तसे करीत असताना जरूर पडल्यास सर्व प्रकारच्या समाजविघातक कृत्यांचा कायद्याच्या सर्व शक्तीनिशी बीमोड करील. याबाबतीतही या राज्यातील जनता माझ्या सरकारला आपले संपूर्ण सहकार्य आणि पाठिंबा देईल अशी मला खात्री आहे.

५. संरक्षण मंत्रालयाच्या वतीने विशिष्ट युद्धसामग्रीचे कारखाने या राज्यात निरनिराळ्या ठिकाणी उभारण्याची जबाबदारी या सरकारने घेतलेली आहे आणि आपल्यातर्फे या कामी आपले कुशल नागरी अभियंते मोठ्या संख्येने कार्य करीत आहेत. हे एक फार मोठे राष्ट्रीय महत्त्वाचे काम आहे. आणि सरकारचा अभियांत्रिकी सेवकवर्ग मोठ्या प्रमाणावरील आपल्या नेहमीच्या अभियांत्रिकी कामांचा भार सांभाळीत असतानाही, युद्धसामग्रीच्या ह्या कारखान्यांचे काम सरकार शक्य तितक्या वेगाने व तातडीने पूर्ण करीत आहे. या कारखान्यांमुळे रोजगारीत वाढ आणि सहायक उद्योगधंद्यांचा विकास या स्वरूपात राज्याला भरीव लाभ घडणार आहे.

६. संरक्षण प्रयत्नांत वाढ करण्याच्या कामाबरोबरच पंचवार्षिक योजनेच्या प्रगतीचा वेग अधिक वाढविण्याची जबाबदारीही तितकीच निकडीची आहे. आपल्या विकास योजनांची उद्दिष्टे आणि दिशा, त्या योजना कार्यान्वित करण्याचे आपले सामर्थ्य आणि पार पाडलेल्या कामात आपल्या अपेक्षेच्या मानाने दिसून येणारी कमतरता यांची सूक्ष्म आणि काळजीपूर्वक तपासणी करण्यात आली आहे. तिसऱ्या योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत केलेल्या प्रगतीचा आढावा घेतल्यास ती बरीच समाधानकारक असल्याचे आढळून येईल. परंतु योजनेचा अलीकडेच जो मध्यकालीन आढावा घेतला त्यावरून शेतकी उत्पादन व औद्योगिक उत्पादन वाढविण्याची तीव्र निकड आहे असे प्रामुख्याने दिसून आले. या उत्पादनांवरच आपली आर्थिक अभिवृद्धी अवलंबून आहे आणि आमच्या संरक्षण प्रयत्नांचा मुख्य आधार देखील तोच आहे. लहान पाटबंधारे व मृद्संरक्षण यांचा विकास, सुधारलेले बी-बियाणे व रासायनिक खते यांचा पुरवठा, शेतकी अवजारांचे वाटप आणि विस्तृत पीक संरक्षण यांसाठी या वर्षी जे दोन सहामाही शेतकी उत्पादन कार्यक्रम सरकारने हाती घेतले आहेत ते चालू ठेवण्याच्या उपाययोजनांवर सरकार भर देईल. ताली बांधणे आणि विहिरी खोदणे

त्याचप्रमाणे विहिरींवर पंप बसविणे याबाबतीत योजनेमध्ये जी लक्ष्ये निश्चित केलेली होती ती ५० टक्क्यांनी वाढवण्यात आली आहेत. भाजीपाला आणि फळफळावळ पिकविणाऱ्यांना प्रत्यक्ष सहाय्य व प्रोत्साहन देखील दिले जाईल. व्यापारी पिकांपासून होणारे उत्पन्न वाढविण्यासंबंधीच्या उपाययोजना आणि बाजारविषयक सवलतींत सुधारणा यांवर अधिक भर देण्यात येईल.

७. शेतीच्या उत्पन्नातील वाढ ही बव्हंशी पाटबंधाऱ्यांची अनुकूलतम योजना करण्यावर अवलंबून असते. महाराष्ट्र राज्य पाटबंधारे आयोगाच्या ज्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत त्या आता शक्य तितक्या लवकर कार्यान्वित केल्या जातील. दरम्यानच्या काळात, पाटबंधाऱ्यांच्या, आधीच उपलब्ध असलेल्या साधनांचा पुरेपूर उपयोग केला जात आहे याची खात्री करून घेण्यासाठी शासनाने उपाययोजनांचा अवलंब केला आहे आणि पुढेही शासन त्याच उपाययोजना शक्य तितक्या त्वरेने कार्यान्वित करील. सरकारी कालवे व उपकालवे यांच्या कक्षेत येणाऱ्या शेतांमधून पाटबंधाऱ्यांचे पाणी नेता यावे यासाठी ज्या खाजगी जमिनींत पाटांचे बांधकाम झालेले नव्हते तेथे ते हाती घेण्यासाठी प्रशासकीय उपाय योजण्यात आले आहेत. शेतांमध्ये पाट बांधण्यास काही शेतकऱ्यांचा विरोध होता. परंतु त्यांचे मन वळवून हा विरोध नाहीसा करण्याबाबत जनतेकडून उत्साहजनक सहकार्य लाभले आहे.

ग्राहकांना वाजवी दराने सकस दुधाचा पुरवठा करणे आणि ग्रामीण क्षेत्रांतील शेतकऱ्यांना एक योग्य असा जोडधंदा मिळवून देणे अशी दुहेरी भूमिका पार पाडण्याच्या कामी, मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, धुळे, मिरज, नागपूर, अमरावती, अकोला आणि औरंगाबाद या ठिकाणच्या दूधपुरवठा योजना भरीव प्रगती करीत आहेत. या राज्यामधील दूधव्यवसायाच्या विकासासाठी सहकारी संघटना अतिशय उपयुक्त व महत्त्वाच्या ठरतील ही गोष्ट ओळखून शासनाने, वरील योजनांकरिता आवश्यक असलेले दूध गोळा करणे, त्याची परीक्षा करणे, वाहतुकीची व्यवस्था करणे, इत्यादी कामे हाती घेण्यासाठी विविध सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन दिलेले आहे. आणि त्यांचे काम शक्य तितके सुकर व्हावे म्हणून शासनाकडून त्यांना निरनिराळ्या सवलती व तांत्रिक मार्गदर्शन दिले जात आहे. मुंबई शहर व काही निवडक शहरे यांच्या दूधपुरवठ्यात वाढ करण्यासाठी चाळीस निवडक खेड्यांमधून दूध गोळा करण्याच्या व प्रशीतनाच्या केंद्रांचे जाळे निर्माण करण्याचे ठरविण्यात आले आहे. म्हशींच्या आणि दूध वाहून नेणाऱ्या मोटारींच्या खरेदीसाठी कर्ज म्हणून ३२ लक्ष रुपये मंजूर करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक प्राथमिक संस्थेला, साधनसामग्रीच्या खरेदीसाठी आणि व्यवस्थापनविषयक अर्थसहाय्य म्हणून, पुरविलेल्या दुधाच्या प्रत्येक मणामागे एक रुपया या दराने विकास अनुदान दिले जाईल. हा कार्यक्रम चालू राहण्यासाठी एक विस्तार-शाखा उघडणे आवश्यक होईल. ही शाखा, दुधाच्या उत्पादनात सर्वतोपरीने सुधारणा घडवून आणण्यासाठी आपले कार्य मिरज विभागात केंद्रित करील. या सर्व उपाययोजनांमुळे दुधाचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने ग्रामीण क्षेत्राला आर्थिक प्रेरणा मिळेल.

थोडक्यात, ग्रामीण क्षेत्रातील दूध उत्पादनाचा प्रश्न आणि नागरी क्षेत्रातील दूध पुरवठ्याचा प्रश्न यशस्वीरीत्या हाताळून या योजनांनी ग्रामीण दुग्धव्यवसाय व सर्वसाधारण दुग्धशाळा विकास या दोन्ही क्षेत्रांत फार महत्त्वाची कामगिरी केलेली आहे व करीत आहेत.

८. शेतकी उत्पादनाचा वेग वाढविण्यासाठी असलेल्या उपाययोजनांपैकी अनेक उपाययोजनांचा बराच मोठा भार शासनाने जिल्हा परिषदांवर टाकलेला आहे. जिल्हा पातळीवरील योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात या राज्याने सूज्ञपणा व दूरदर्शीपणा दाखविला हे स्पष्ट दिसून येत आहे.

९. मोठ्या पाटबंधाऱ्यांचे नवीन प्रकल्प पूर्ण झाले असून अलीकडेच त्यांचा वापर सुरू झाला आहे. मराठवाड्याच्या परभणी व नांदेड जिल्ह्यांतील कोरडवाहू पिकांखालील दीड लाख एकर जमीन लवकरच नवीन पूर्णा प्रकल्पाच्या कालवे पद्धतीखाली आणण्यात येईल आणि नव्यान सुरू करण्यात आलेल्या मानार धरणामुळे नांदेड जिल्ह्यातील २५,००० एकर जमीन पाण्याखाली येईल. नुकत्याच सुरू झालेल्या नळगंगा प्रकल्पामुळे भिजू शकणाऱ्या सुमारे २२,००० एकर जमिनीपैकी ११,००० एकर जमीन भिजेल. हा प्रकल्प बुलढाणा जिल्ह्यात आहे. अकोला जिल्ह्यातील एकबुर्जी व काटेपूर्णा या प्रकल्पांमुळे लवकरच अनुक्रमे ८,००० व २,००० एकर जमिनींना पाणी मिळेल. या राज्यातील नद्यांच्या पात्रांतील जलसंपत्तीचा आणि आणखी काही मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांचा उपयोग करून घेण्यासाठी बृहत् योजना (मास्टर प्लॅन) तयार करण्याच्या दिशेने देखील शासन जलद गतीने पावले टाकणार आहे. संभाव्य जलसिंचनक्षमता उपयोगात आणता यावी म्हणून घोड व गंगापूर पाटबंधारे योजनांच्या एकत्रित प्रकल्पास नुकतीच मंजुरी देण्यात आली आहे.

१०. लहान पाटबंधाऱ्यांच्या योजना त्वरेने पूर्ण करण्याची निकड देखील शासनाला पटलेली असून त्या दृष्टीने शासन एक मोठा कार्यक्रम हाती घेणार आहे. या क्षेत्रातसुद्धा जिल्हा परिषदांनी जी कामगिरी बजावली आहे ती प्रशंसनीय आहे. या संस्थांना, त्यांजकडे सोपविलेली लहान पाटबंधाऱ्यांची बांधकामे किंवा दुरुस्तीची कामे करता यावीत म्हणून शासन पुरेशा रकमेची तरतूद करील.

चालू वर्षात राज्यातील मत्स्यव्यवसाय वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने उत्पादन वाढ आणि कोळ्यांच्या परिस्थितीत सुधारणा या दोन्ही बाबतीत बरेच काम करण्यात आले आहे. मासेमारीच्या होड्या यंत्रचलित करण्याच्या बाबतीत महाराष्ट्र आघाडीवर असून आणखी सुमारे १०० एंजिने होड्यांवर बसविण्यात आली आहेत. अशा एंजिनांच्या खरेदीसाठी कोळ्यांना १०० टक्के सहाय्य देण्यात येते. त्यापैकी ५० टक्के रक्कम कोणतीही परामर्यादा न घालता अर्थसहाय्य म्हणून आणि उरलेली ५० टक्के रक्कम १५ वर्षांच्या परतफेडीने कर्ज म्हणून देण्यात येते. यापूर्वी हीच रक्कम सात वर्षांत फेडावी लागत असे.

कोळ्यांना, होड्या बांधण्यासाठी, जाळी आणि इतर सामग्री खरेदी करण्यासाठी आणि तसेच त्यांच्या विपत्काळी उदारपणे मदत देण्यात येते. सध्या हाती घेतलेल्या योजनांमध्ये मत्स्यव्यवसायात सहकारी चळवळीला उत्तेजन देणे, मासळी शीतगृहांत ठेवण्याच्या आणि वाहतूक करण्याच्या सोयी करणे आणि कोळी जमातीतील तरुणांना प्रशिक्षण देण्यासाठी संस्था स्थापन करणे, या योजनांचा समावेश होतो. सहकारी क्षेत्रात, जाळी आणि दोरी तयार करण्याचा कारखाना

ठाणे येथे नुकताच सुरू करण्यात आला आहे. हा भारतातील या प्रकारचा पहिलाच कारखाना आहे. बर्फाचे आणखी काही कारखाने सुरू करण्यात आले असून काही सुरू होण्याच्या मार्गावर आहेत. मासे डबेबंद करण्याचा कारखाना मालवण येथे पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. तुलनात्मक-दृष्टचा महाराष्ट्रात सहकारी मत्स्यव्यवसाय संस्थांची संख्या बरीच मोठी म्हणजे २२० आहे. मत्स्यव्यवसायाच्या भूजल तलावांची संख्याही तशीच मोठी असल्यामुळे अशा तलावांमध्ये भरण्यासाठी गोडचा पाण्यातील माशांची बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आयात करण्यात आली आहे आणि या माशांची पैदास विस्तृत प्रमाणावर करण्यासाठी शासनाने स्वतःच्या मत्स्यनिपज योजना सुरू केलेल्या आहेत.

११. औद्योगिक वाढीस अधिक चालना मिळण्याच्या दृष्टीने राज्याने आखलेल्या कार्यक्रमात बरीच प्रगती झालेली आहे. ह्या बाबतीत, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, राज्य वित्तीय महामंडळ आणि लघु उद्योग महामंडळ यांनी बजावलेली कामगिरी ही अतिशय महत्त्वाची व मोलाची आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे, मोठ्या, मध्यम आणि लघु उद्योगांसाठी औद्योगिक क्षेत्रे आणि व्यावसायिक वसाहती स्थापन करण्यामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावीत आहे. त्यामुळे १९६४–६५ मध्ये औद्योगिक प्रगतीसाठी, विशेषेकरून: नागपूर, नाशिक आणि कुलाबा या भागांत विस्तार-क्षेत्र निर्माण होईल तसेच, राज्य वित्तीय महामंडळ हे, खाजगी क्षेत्रातील लघु उद्योग घटकांच्या दीर्घ आणि मध्यम मुदतीच्या कर्जविषयक गरजा भागविण्यासाठी प्रशंसनीय प्रयत्न करीत आहे. लघु उद्योग महामंडळाने गेल्या वर्षापासून काम सुरू केले असून ते मंडळ लघु उद्योग घटक चालू ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या कच्च्या मालाच्या वखारी स्थापन करील. लघु उद्योग क्षेत्रामध्ये स्थानिक साधन संपत्तीवर अवलंबून असलेल्या उद्योगधंद्यांच्या फायद्यासाठी औद्योगिक विकासाच्या मार्गावर असलेल्या नगरेतर ( Mofussil ) केंद्रांमध्ये औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. औद्योगिक विकास कार्यक्रमाची ही बाजू आता पुरेशी गतिमान झाली आहे.

सरकारने वीजनिर्मितीच्या विकासाकडे बरेच लक्ष दिलेले असून नाशिक भागात एक व मराठ-वाड्यात परळी येथे दुसरी अशा दोन मोठ्या औष्णिक (थर्मल) विद्युत योजनांसाठी केंद्र सरकारची संमती मिळविली आहे. ह्या योजना चौथ्या पंचवार्षिक योजनेत हाती घेण्यात येतील. दरम्यान, कोयना प्रकल्पाच्या प्रथमावस्थेतील चार विद्युतयंत्रे (युनिट्स) चालू झाली असून सरकारने दुसऱ्या टप्प्यातील कामास आणि तिसऱ्या टप्प्याची आखणी करण्यास सुरुवात केली आहे.

१२. औद्योगिक शांतता टिकून राहिली तरच औद्योगिक विकास अविरतपणे होऊ शकतो ह्या राज्यात मालक व कामगार यांचे सलोख्याचे संबंध राहावेत या गोष्टीची माझे सरकार फार काळजी घेत असून मध्यस्थ म्हणून शासन आपली भूमिका नेहमीच सर्वतोपरी सद्भावनेने पार पाडील. निरनिराळ्या उद्योगधंद्यांतील कामगारांच्या वेतनांच्या पातळीची तपासणी करण्यात येत असून ह्या उद्योगधंद्यांसाठी किमान वेतन सल्लागार समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीने तीन प्रकरणांच्या बाबतीत आपला अहवाल सादर केला असून हॉटेल कामगार व जिनिंग व प्रेसिंग उद्योगधंद्यांतील कामगार यांच्या बाबतीत किमान वेतन निश्चित करण्यात आले

आहे. मालक व कामगारवर्ग यांमधील चांगले संबंध बिघडू नयेत म्हणून सरकारकडून नेहमीच आस्थापूर्वक प्रयत्न केले जातील आणि जेव्हा जेव्हा हे संबंध बिघडतील तेव्हा त्यांतून त्वरित मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

कामगार आणि उद्योगधंदे यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी दुसरी उपाययोजना म्हणजे श्री. लकडावाला यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ञ समितीने ग्राहक मूल्य निर्देशांकाची केलेली फेरतपासणी ही होय. सरकारने या समितीचा अहवाल विचारात घेऊन त्यावर निर्णय घेतले व त्यामुळे कामगारांच्या महागाई भत्यात वाढ होऊन त्यांचा फायदा झालेला आहे.

१३. ग्राहकांना वाजवी भावाने पुरवठा करता यावा म्हणून आवश्यक वस्तूंचा पुरेसा साठा करण्याचे व त्यांची भाववाढ रोखण्याचे काम जोमाने व सर्व संबंधितांच्या सहकार्याने चालू ठेवण्यात आले. सरकारजवळील अन्नधान्यांचा साठा पुरेसाच नव्हे तर आणीबाणीपूर्वी होता त्याहूनही अधिक मोठा आहे. या साठ्याचे वाटप जवळजवळ १०,००० स्वस्त धान्यांच्या दुकानांमधून केले जाते. या दुकानांतून साखरेचीही विक्री केली जाते. याशिवाय साखरेची विक्री करणाऱ्या इतर दुकानांची संख्याही तेवढीच आहे. किंमती वाजवी पातळीवर राहाव्यात म्हणून सरकारने मुंबईत व जिल्ह्यांत योग्य मूल्य पर्यवेक्षण समित्या व समन्वय समित्या स्थापन केल्या आहेत. या समित्यांमध्ये ग्राहकांच्या व व्यापाऱ्यांच्या प्रतिनिधींचा समावेश केलेला आहे. अशा प्रकारच्या ऐच्छिक सहकार्याला आवश्यक तेथे कायदेशीर उपायांची जोड देऊन किंमती वाजवी मर्यादेत ठेवण्यासाठी शासन शक्य त्या सर्व गोष्टी करीत आले आहे. तथापि, अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत हे राज्य आजवर तुटीचे असल्याकारणाने आपल्या धान्य पुरवठ्यासाठी त्याला अधिक धान्यसाठा असलेल्या इतर राज्यांवर बरेच अवलंबून राहावे लागते, आणि त्यामुळे, त्या राज्यांकडून आपल्याला व्यापारी लेख्यावर (ट्रेड अकाउंट) धान्याचा जेवढा साठा मिळतो त्यावरून आणि त्या राज्यांमध्ये प्रचलित असलेल्या किंमतींवरून आपल्या येथील किंमती ठरवाव्या लागतात, हे लक्षात ठेवले पाहिजे.

शेतकऱ्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे आणि त्यांना आपल्या उत्पादित मालाचा किफायतशीर मोबदला मिळतो की नाही हे पाहणे हेही शासनाचे कर्तव्य आहे ; आणि हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच शासनाने ज्वारी, भात, तांदूळ यांसारख्या निरनिराळ्या वस्तूंच्या आधार किंमती (प्राईस सपोर्ट) अलीकडेच वाढवलेल्या आहेत. गुळासंबंधीच्या धोरणात सुधारणा केल्यामुळे गूळ उत्पादकांना भरपूर फायदा झाला आहे आणि ग्राहकांना गुळाचा वाजवी दराने पुरेसा पुरवठा होत आहे.

१४. सामाजिक सेवांच्या क्षेत्रात, विशेषत: शिक्षण, आरोग्य व घरबांधणीच्या कार्यक्रमात शासनाने दिलेल्या अभिवचनांच्या परिपूर्ततेसाठी सरकार योग्य त्या उपाययोजना करील. राष्ट्रसंरक्षणाच्या कार्याबाबत विद्यार्थ्यांना कर्तव्याभिमुख करणे आवश्यक झाले असून त्या दृष्टीने महाविद्यालयांतील पहिल्या दोन वर्षांमधील युवक विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय छात्रसेनेचे प्रशिक्षण सक्तीचे करण्यात आले आहे. राष्ट्रीय छात्रसेनेच्या व सहायक छात्रसेनेच्या प्रशिक्षणाचा आणि तद्वतच शारीरिक शिक्षण व राष्ट्रीय शिस्त यासंबंधीच्या योजनांचा विस्तार करण्यास सरकार प्रोत्साहन देत राहील. आमच्या तरुणांचे शिक्षण हे सरकारचे प्रमुख अंगीकृत कार्य म्हणून चालू राहील आणि त्याचबरोबर

प्रौढ शिक्षणाच्या बाबतीतील योजनांचा देखील जोमाने पाठपुरावा करण्यात येईल. यापूर्वीच सरकारने १,२०० खेड्यांमध्ये पूर्ण साक्षरतेचे आपले उद्दिष्ट साध्य केलेले आहे.

१५. तांत्रिक शिक्षणाच्या सोयी वाढविण्यावर अधिक भर देण्याचे सरकारने योजिले आहे. संरक्षण प्रयत्नासाठी तंत्रज्ञांना प्रशिक्षण देण्याच्या कार्यक्रमात भाग घेताना आम्हाला असे आढळून आले की, तांत्रिक शिक्षणाच्या प्रमाण अभ्यासक्रमांची, तसेच २,००० विद्यार्थ्यांकरिता अल्पमुदतीच्या खास प्रशिक्षणाच्या कार्यक्रमांची गती वाढविणे आवश्यक झालेले आहे. ही उद्दिष्टे त्वरित साध्य करण्याच्या दृष्टीने सरकार सर्व प्रकारच्या योग्य उपाययोजना करील. शैक्षणिक संस्थांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी एका 'सहकारी शिक्षण वित्त संस्थेची' लवकरच नोंदणी करण्यात येईल हे मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. ही संस्था इमारती बांधण्यासाठी व साधनसामग्री मिळविण्यासाठी शैक्षणिक संस्थांना कर्जे देईल. अमरावती येथे एक अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याकरिता केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने आपली अंतिम संमती दिलेली आहे, याही गोष्टीचा उल्लेख करण्यास मला आनंद वाटतो.

१६. सरकारी रुग्णालयांतील व्यवस्थेचा दर्जा व रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी यांत सर्वसाधारणपणे सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता दिसून आल्यामुळे त्यासंबंधी सरकार काही काळ आस्थापूर्वक विचार करीत होते. पंचवार्षिक योजनेखालील वैद्यकीय योजनांचा विस्तार करण्यासाठी केलेल्या तरतुदींच्या जोडीलाच वैद्यकीय सेवांच्या कार्यक्षमतेची व उपयुक्ततेची पातळी एका विवक्षित मर्यादेपर्यंत उंचावण्यासाठी या वर्षी नेहमीच्या रकमांपेक्षा पुष्कळच अधिक प्रमाणात आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. विशेषतः ग्रामीण क्षेत्रात वैद्यकीय सेवांत सुधारणा घडवून आणणे आणि त्यांचा विस्तार करणे या गोष्टींकडे अधिक लक्ष पुरविण्याचे सरकारने ठरविले आहे. त्याचबरोबर या क्षेत्रात मलेरियाचे निर्मूलन करण्यासाठी तसेच हत्तीरोग, क्षय व महारोग यांसारख्या रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी खास उपाययोजना अधिक जोमाने करण्यात येतील.

१७. लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली तर त्यामुळे आर्थिक लाभ हळूहळू घटण्याची शक्यता निर्माण होईल या गोष्टीची सरकारला अत्यंत काळजी वाटते, आणि यासाठी सरकारने कुटुंब नियोजनाची अत्यंत जोरदार मोहीम हाती घेतली असून त्याद्वारे पुढील १० वर्षांत जनन-प्रमाण ५० टक्क्यांनी कमी करण्याचे योजिले आहे. तिसऱ्या योजनेच्या कालावधीत प्रत्येकी ३ उपकेंद्रे असलेली अशी ४७१ कुटुंब नियोजन केंद्रे उघडण्यात येणार आहेत. चालू वर्षी २४७ केंद्रे उघडावयाची आहेत. पुरुषांवरील संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेचा कार्यक्रम चांगलाच यशस्वी झाला असल्याचे आढळून आल्यामुळे आता चालू वर्षी हा कार्यक्रम दुप्पट वेगाने कार्यान्वित करण्याचे योजिले आहे. या कार्यक्रमास आणि तद्वतच सामाजिक व आर्थिक कल्याणाच्या इतर कार्यक्रमांना जनतेचे जास्तीत जास्त सहकार्य आवश्यक असून तसे ते मिळेल अशी मला खात्री वाटते.

१८. अग्रक्रम देण्यात आलेल्या कार्यक्रमांत, दळणवळणाच्या सोयींची वाढ व सुधारणा करण्याच्या कार्यक्रमास माझ्या सरकारने स्थान दिलेले आहे. रस्ते सुस्थितीत ठेवण्याची कामे पुरेशा कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी सरकार जरूर ती उपाययोजना करील. नवीन रस्तेबांधणीसंबंधी सांगावयाचे म्हणजे तिसऱ्या योजनेच्या कालावधीत ४०० मैल लांबीचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य

महामार्ग आणि जिल्ह्यांत व खेड्यांमध्ये ३,००० मैलांचे रस्ते बांधण्याचे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य सरकारने निश्चित केले आहे. अधिक निकडीच्या इतर कामांमुळे ज्या ठिकाणी अलीकडील काही वर्षांत रस्ते बांधणीचे कार्यक्रम मागे पडले आहेत त्या ठिकाणी माझे सरकार शक्यतोवर ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करील. विशेषतः मराठवाड्याच्या मागासलेल्या विभागात चार कोटी रुपये खर्चाचा आणखी एक विशेष कार्यक्रम सुरू करण्यात आला असून तो जोमाने पार पाडण्यात येईल. अलीकडील वर्षांमध्ये हाती घेतलेल्या अत्यंत महत्त्वाच्या कामांत पश्चिम किनाऱ्यालगतच्या रस्त्याचा समावेश होत असून त्याचे ३३२ मैल लांबीचे काम पूर्ण झाल्यावर मुंबई व गोवा यांना जोडणारा माग तयार होईल. विशेषतः या राज्यामधील दळणवळणास कठीण अशा किनाऱ्यालगतच्या प्रदेशात उत्तम बारमाही रस्त्यांचे महत्त्व फार आहे हे लक्षात घेऊन पुढील दोन वर्षांमध्ये किनाऱ्यालगतच्या या रस्त्यांवर कॉंक्रिट घालण्याचे काम पुरे करण्याचा सर्व प्रकारे प्रयत्न करण्यात येईल. रत्नागिरीतील मिऱ्या बंदर बारमाही करण्याचे काम पूर्ण झाल्यावर कोंकण विभागाच्या विकासात अपरिमित वाढ होईल. या कामास भारत सरकारकडून नुकतीच मान्यता मिळालेली आहे.

१९. विस्तार-पूर्व सामूहिक विकास गटांपैकी १६$\frac{१}{२}$ गटांना प्रथमावस्था गटांची वरची श्रेणी देण्यात आल्यामुळे राज्यातील सर्व खेडी आता सामूहिक विकास कार्यक्रमानुसार विकासाच्या प्रकर्षावस्थेखाली आली आहेत. सामूहिक विकास गटांपैकी २६ गटांची प्रकर्षावस्था यापूर्वीच पूर्ण झाली असून पुढील वर्षामध्ये आणखी असे २२ गट त्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचतील. ज्यांना भारत सरकारचे सहाय्य मिळत नाही अशा गटांतील विकास कार्यांची गती कायम टिकविण्यासाठी त्यांना या वर्षी विशेष अनुदान देण्यात आलेले आहे. मुख्यत्वेकरून अनुसूचित जमातींची वस्ती असलेल्या विभागातील सामूहिक विकास गटांमधील विकास कामे अधिक जोमाने पार पाडण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतीत ४६ अनुसूचित जमाती विकास गट सुरू करण्याचे योजिले आहे. आतापर्यंत असे १८ गट सुरू करण्यात आले आहेत. या योजनेच्या उरलेल्या दोन वर्षांच्या काला-वधीत प्रत्येक वर्षी आणखी १४ गट सुरू करण्याचे योजिले आहे.

राज्याच्या ९,२२२ खेड्यांमध्ये पिण्याचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. विहिरी बांधणे किंवा त्या दुरुस्त करणे यांसारख्या सर्वसाधारण उपाययोजना करून सुमारे ७,२०९ खेड्यांपुरता हा प्रश्न सोडविता येईल अशी अपेक्षा आहे. या खेड्यांतील ही विद्यमान समस्या शक्यतो लवकर सोडविण्याची सरकारची तीव्र इच्छा आहे. आणि ती पूर्ण करण्याकरिता अशा खेड्यांतील स्थानिक विकास कामांच्या कार्यक्रमानुसार बांधकामांसाठी जनतेकडून घेण्यात येणाऱ्या अंशदानाचा दर ५० टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. निर्जल व क्षारयुक्त क्षेत्रातील बाकीच्या २,०१३ खेड्यांत, एका खेड्यासाठी किंवा खेड्यांच्या गटासाठी नळातून पाणी पुरवठा करण्याच्या योजनेसारख्या विशेष योजना हाती घेऊनच हा प्रश्न सोडविता येईल. चालू योजनेच्या काळात सुमारे ५६८ खेड्यांमध्ये, अशा योजनांचे बांधकाम सुरू होईल अशी अपेक्षा आहे. बाकीच्या खेड्यांसाठी प्राथमिक पाहणीचे काम चालू आहे.

२०. घरबांधणीच्या कार्यक्रमानुसार पार पडलेले कार्य उल्लेखनीय झाले आहे. औद्योगिक कामगार, गलिच्छ वस्त्यांमध्ये राहणारे लोक, जनतेतील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेला वर्ग

आणि कमी व मध्यम उत्पन्नाच्या गटांतील कुटुंबे यांच्यासाठी घरबांधणीच्या योजनांखाली १५,००० गाळे बांधण्यासाठी योजनांतर्गत व योजनांव्यतिरिक्त अन्य तरतूद करण्यात आली होती.

समाजातील आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या वर्गातील व्यक्तींना म्हणजे ज्यांचे मासिक उत्पन्न मुंबईत दरमहा रु. २५० आणि इतरत्र दरमहा १७५ रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा इसमांना अर्थसहायित भाडयाने घरे देण्यासाठी घरबांधणीची नवी योजना आतापावेतो मुंबई, नागपूर, औरंगाबाद व धुळे येथे हाती घेण्यात आली असून ती इतर जिल्ह्यांतसुद्धा लागू करण्याचे योजिले आहे. तसेच सरकारने, मुंबई शहरात घरे पडल्यामुळे बेघर झालेल्या लोकांसाठी २०० गाळयांची तरतूद केली आहे.

मराठवाडा विभागात महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने कार्य सुरू केले असून औरंगाबाद येथे पहिल्या गृहनिर्माण योजनेचे काम सुरू झाले आहे व या विभागाच्या निरनिराळ्या जिल्ह्यांतील सर्व विद्यमान घरवसाहतींच्या व्यवस्थेचे कार्य मंडळाच्या एका शाखेकडे देण्यात आले आहे.

मालकी हक्काच्या गाळयांच्या पद्धतीचे नियमन करण्याकरिता या सरकारने केलेला कायदा हा अशा प्रकारचा भारतातील पहिलाच कायदा असून एक आदर्श कायदा म्हणून भारत सरकारने इतर राज्यसरकारांकडे विचारार्थ त्याची शिफारस केली आहे.

२१. अलीकडील काही आठवडयांत दारूबंदीच्या विषयावर काहीसे वादंग निर्माण झाले आहे. संविधानात घालून दिलेल्या दारूबंदीविषयक धोरणास हे सरकार ठामपणे बांधलेले आहे. तथापि, गेल्या १४ वर्षांच्या कालावधीत दारूबंदीच्या कायद्याची अंमलबजावणी करताना आलेल्या अनुभवावरून, या राज्यात दारूबंदीची जी परिस्थिती अस्तित्वात आहे तिच्यामुळे सार्वजनिक हितास गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे आणि संविधानाने दाखवून दिलेले ध्येय साध्य करण्यासाठी अवास्तववादी व कल्पनारंजक मार्गाचा अवलंब केल्यास हा धोका वाढण्याची शक्यता आहे, या गोष्टीची सरकारला जाणीव झाली आहे. बेकायदा दारू गाळण्याचा धंदा करून किंवा अपायकारक मद्यार्काचा व्यापार करून कायदा मोडणाऱ्या लोकांना उपजीविकेचे एक सोपे व लाभदायक साधन राज्याने उपलब्ध करून देणे हा दारूबंदीचा हेतू कदापि असू शकत नाही. त्याचप्रमाणे ज्यांच्या हितासाठी दारूबंदी योजिली होती त्याच लोकांच्या आरोग्यास त्यामुळे गंभीर स्वरूपाची हानी पोहोचावी हाही हेतू असणे शक्य नाही. म्हणून ज्यायोगे या धोरणाची अंमलबजावणी अधिक वास्तववादी व परिणामकारक होईल आणि दंडात्मक व दडपशाहीच्या पद्धती वापरून व्यसनासक्त असलेल्या प्रौढ लोकांना मार्गावर आणण्यापेक्षा तरुण पिढीला मद्य-पानाच्या दुष्परिणामापासून वाचविता येईल, असे उपाय योजण्याचा माझ्या सरकारचा निर्धार आहे. तसेच जे समाजद्रोही लोक बेडरपणे आपल्या नागरिकबंधूंच्या दुबळेपणाचा फायदा घेतात त्यांना तसे करण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून बेकायदा दारूची निर्मिती आणि व्यापार शक्य तितक्या परिणामकारक रीतीने दडपून टाकण्याचे देखील माझ्या सरकारने ठामपणे ठरविले आहे. दारूच्या व्यसनापासून जादा उत्पन्न मिळविण्याची या सरकारची मुळीच इच्छा नाही. आणि म्हणून व्यसनासक्तीने अथवा अन्यथाही मद्यपान करणाऱ्यांना मद्यपानापासून मुक्त करता यावे आणि त्यांना आर्थिक उन्नतीची व सामाजिक प्रगतीची साधने उपलब्ध करून देता यावीत यासाठी दारूची निर्मिती व तिची विक्री यांपासून मिळणाऱ्या जादा उत्पन्नाचा विनियोग मुख्यत्वेकरून त्या लोकांच्या शिक्षणाकडे व कल्याणाकडे करण्याचा माझ्या सरकारने निर्धार केला आहे.

२२. मी आता या सबंध राज्याच्या दृष्टीने काही अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नांचा उल्लेख करणार आहे.

गोव्यामध्ये लोकशाही स्वरूपाचे सरकार स्थापन झाले आहे याबद्दल माझ्या सरकारला समाधान वाटते आणि या घटनेमुळे गोव्यातील जनता व महाराष्ट्रातील जनता यांच्यामध्ये अस्तित्वात असलेले सांस्कृतिक, ऐतिहासिक व भाषिक अनुबंध दृढ होण्यास मदत होईल याविषयी मला मुळीच शंका नाही.

२३. सर्वसामान्यपणे महाराष्ट्रातील लोकमत अजमावता, या सरकारला म्हैसूर राज्याबरोबर रेंगाळत पडलेल्या सीमावादाबाबत तीव्र चिंता व्यक्त करणे भाग पडत आहे आणि हा वाद समाधानकारक रीतीने व कायमचा सोडवण्याच्या दृष्टीने त्वरित उपाय योजण्यात भारत सरकार पुढाकार घेईल अशी सरकारला दृढ आशा वाटते. हा वाद यापुढे अनिर्णीत ठेवणे हे राष्ट्रीयदृष्टचा हिताचे ठरणार नाही असे माझ्या सरकारचे मत आहे.

२४. आंध्र, म्हैसूर व महाराष्ट्र या राज्यांनी कृष्णा व गोदावरी या नद्यांचे पाणी वाटून घेण्यासंबंधी मार्च १९६३ मध्ये भारत सरकारने ज्या सूचना केल्या आहेत त्याबद्दल माझ्या सरकारला तीव्र चिंता वाटते. भारत सरकारने सुचविलेले वाटप कोणत्याही सयुक्तिक तत्त्वांवर आधारलेले नाही असे माझ्या सरकारचे मत असून हा प्रश्न समाधानकारक रीत्या सोडविण्याची भारत सरकारला आग्रहपूर्वक विनंती केली आहे. या नद्यांच्या पाणी वाटपाचा विषय महाराष्ट्रातील जनतेला अत्यंत जिव्हाळ्याचा वाटत असून सयुक्तिक तत्त्वांखेरीज अन्य कोणत्याही रीतीने केलेल्या वाटपामुळे या राज्यावर कायमचा अन्याय होईल आणि त्याची नेहमीकरिता हानी होईल.

२५. तिसऱ्या योजनेत आम्ही गुंतलेले असताना देखील, चौथ्या योजनेचा आधार म्हणून, आर्थिक व सामाजिक विकासाची जी व्यापक उद्दिष्टे आम्ही स्वीकारायला हवी त्यांची रूपरेषा ठरविण्याचे काम अभ्यास गटांनी आधीच हाती घेतलेले आहे. परंतु नियोजनाच्या प्रक्रियेचा हा केवळ एक भाग आहे. यानंतर सर्व पातळ्यांवरील विचारविनिमयासाठी उपाययोजना करण्यात येईल. हेतू हा की खेडे, गट, जिल्हा आणि विभाग या सर्व स्तरांवरील परिपक्व विचारातून चौथी पंचवार्षिक योजना साकार व्हावी.

२६. पूर्वी आपण ज्या कसोटीच्या प्रसंगांतून पार पडलो व जी उद्दिष्टे साध्य केली त्यांजकडे आपण अभिमानाने व उचित समाधानाने पाहू शकतो. परंतु आपणास विश्रांती वा उसंत घेता येणार नाही. आपल्यापैकी बहुसंख्य लोकांच्या वाट्यास आलेले दैन्य आणि दारिद्र्य, खालावलेले जीवनमान, अज्ञान व रोगराई यांमुळे घडून आलेला अनर्थ, शिक्षणाचा अभाव आणि आपल्या जनतेपैकी पुष्कळांना जाचणारी संधीची वाण या सर्व गोष्टी आपणास आव्हान देणाऱ्या आहेत. परंतु आपल्या सर्वांत्रे चिकाटीचे प्रयत्न, अविश्रांत परिश्रम आणि स्वार्थत्याग यायोगे आपण हे आव्हान स्वीकारू शकू. राष्ट्रउभारणीचे कार्य नुकतेच सुरू झालेले आहे आणि आर्थिक समृद्धीच्या उद्दिष्टापासून आपण अद्यापि फार दूर आहोत. आर्थिक समृद्धीसाठी राष्ट्रीय एकात्मता आणि ऐक्य या प्रथमावश्यक बाबी होत. म्हणून राष्ट्राच्या सेवेसाठी,

जातीधर्मांचे विविध अडसर कायमचे नष्ट करण्यासाठी आणि सबंध देशाच्या कल्याणार्थ झटण्यासाठी आपण पुन्हा एकवार वचनबद्ध होऊ या. आपल्या देशाच्या सीमांवरील अचानक धाडींना खंबीरपणे तोंड देण्यास समर्थ होईल अशा बलाढ्य राष्ट्राची उभारणी करणे आपणास केवळ याच मार्गाने शक्य होईल. विधानमंडळात व त्याबाहेर आपण जे परिश्रम कराल त्यावरच या उद्दिष्टांची परिपूर्ती अवलंबून आहे. आता आपण आपल्या चर्चेस प्रारंभ करू शकता. आपली ही चर्चा फलदायी व्हावी, अशी मी मनःपूर्वक प्रार्थना करते.

जय हिंद !